# प्रसिद्धीपत्रक

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. १८ फेब्रु. २०१८**

## गुणपडताळणी व आवेदनपत्रातील दुरुस्ती करणेसाठीची मुदतवाढ

संदर्भ :- या कार्यालयाचे प्रसिध्दीपत्रक दि. २०/०६/२०१८.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक १८ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल गुरूवार, दि. २१ जून, २०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता www.mscepune.in व https://puppss.mscescholarshipexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात आलेला आहे.

विद्यार्थ्यांना गुणपडताळणी व आवेदनपत्रातील दुरुस्ती करुन घ्यावयाची असल्यास संबंधित शाळांच्या लॉगीनमध्ये दि. २१ जून, २०१८ ते ३० जून, २०१८ या कालावधीत ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता मुदत देण्यात आलेली होती. तथापि सदर ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक अडचणी येत असल्याने पालक / विद्यार्थी / शाळांच्या विनंतीनुसार **दि. १० जुलै, २०१८ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.** दि. १० जुलै, २०१८ रोजीनंतर ऑनलाईन अर्ज करता येणार नाही.

विहित मुदतीत आवश्यक शुल्कासह ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जानुसार गुणपडताळणीचा निर्णय संबंधित शाळेच्या लॉगीनमध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत कळविण्यात येईल. विहित मुदतीत ऑनलाईन आलेले गुणपडताळणी अर्ज निकाली काढल्यानंतर अंतिम निकाल व गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१.**

**ठिकाण - पुणे**
**दिनांक -** २१|०६|२०१८

D:\MOKASHI\2018\scholarship exam 2018 PRASIDHHIPATRAK.docx